**पाऊस  निसर्गाचा**

घोंघावत्या वात झुळूकात
क्षणदिप्त वीज चपळाई
पडघम मेघ वर्षावा
सुखद आल्हाद शिडकावा ll १ ll

ओघ आवेग अविश्रांत
धार वृक्षात विरघळणारी
पाऊस असा उतरावा
पर्णी तुषार गुंजारावा ll २ ll

अवकाश जल भारीत
सोसवेना दिरंगाई
मातीने थेंब टिपावा
त्यास तिथे विसावा ll ३ ll

कृपा निसर्ग ओसंडत
पाऊस एक नवलाई
कणकणात भास सुखावा
हर रोमरोम शहारावा ll ४ ll

**Sachin.P.Kulkarni**
**www.saarthbodh.com**